महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २३२ वे दिनांक : १८/०८/२०२६ वार : मंगळवार

## एकनाथ शिंदे काँग्रेसमध्ये येणार होते : हुसेन दलवाईचा दावा





**मुंबई :** राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी कराड व मुंबईतील पत्रकार परिषदेत भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे काँग्रेसमध्ये येणार असल्याचा मोठा दावा केला होता. या विधानाची चर्चा सुरू असतानाच, काँग्रेसचे आणखी एक ज्येष्ठ नेते हुसेन दलवाई यांनीही एकनाथ शिंदे हेदेखील काँग्रेसमध्ये प्रवेश करणार होते, मात्र काँग्रेसच्याच काही नेत्यांनी त्यांचा हा प्रवेश होऊ दिला नाही, असा खळबळजनक गौप्यस्फोट केला. दलवाई यांच्या या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले असून, आता या नव्या दाव्यावर खुद्द पृथ्वीराज चव्हाण यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

हुसेन दलवाई यांनी एकनाथ शिंदे यांच्याबाबत केलेल्या वक्तव्यासंदर्भात विचारले असता, हा नवीन विषय असल्याचे सांगत माजी पृथ्वीराज चव्हाण यांनी आपली भूमिका मांडली. यावर अधिक भाष्य करताना ते म्हणाले की, एकनाथ शिंदे आणि आमची चर्चा झाली होती. मात्र काय झाली ते सांगणार नाही. एकनाथ शिंदे आमचे मित्र आहेत ते आमचे काम करत नाहीत मात्र आजही आमचे मित्र आहेत ते आमच्या जिल्ह्यातले आहेत. आमच्या अनेक गाठीभेटी झाल्या होत्या मात्र त्यावर मी बोलणार नाही, असे स्पष्टीकरण चव्हाण यांनी दिले.

भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या काँग्रेस प्रवेशाच्या विषयावर अधिक माहिती देताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, 13 ऑक्टोबरला गोपीनाथ मुंडे आणि माझी भेट झाली होती. त्यानंतर 18 ऑक्टोबरला मी दिल्लीत गेलो होतो, त्यावेळी कुठलाही कार्यक्रम नव्हता फक्त हाच विषय दिल्लीत होता.याला साक्षीदार माणिकराव ठाकरे आहेत. गोपीनाथ मुंडेंबाबतचा एकच प्रस्ताव घेऊन गेल्यानंतर सोनिया गांधी आणि अहमद पटेल यांच्यासोबत बैठक झाली होती.

मुंडे यांच्या काँग्रेस प्रवेशाबाबत पक्षश्रेष्ठी सकारात्मक असल्याचे सांगताना चव्हाण पुढे म्हणाले की, लोकसभेमध्ये मुंडे साहेब हे उपनेते होते, त्यावेळी सोनिया गांधी आणि सर्वांनाच हे पटलेलं होतं.आमच्या भागातील सर्वात मोठा ओबीसी नेता आहे असं सांगितले होते. हा इतिहास आहे. गोपीनाथ मुंडे मोठे राजकीय नेते होते म्हणून मी आता बोललो.याच्या आधीही मी बोललो होतो मात्र कोणीही हा विषय पिकअप केला नव्हता. पक्षामध्ये या असं त्यांना म्हटलं मात्र ते म्हटले की तसं जर प्रवेश केला तर मला निवडून येणं अवघड होईलं. नागपुरमधले दोघेजण मला खूप त्रास देतील असेही गोपीनाथ मुंडे मला म्हटले होते.

## पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवास अवघ्या दोन तासांत : नितीन गडकरींची मोठी घोषणा



**पुणे :** पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी राज्याच्या रस्ते विकासाबाबत महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. यावेळी बोलताना ते म्हणाले की, पुणे ते छत्रपती संभाजीनगर हा प्रवास अवघ्या दोन तासांत पूर्ण व्हावा, हे माझे स्वप्न असून त्यासाठी शानदार महामार्ग विकसित केला जात आहे. या प्रस्तावित सहापदरी महामार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगर आणि तिथून पुढे थेट नागपूरपर्यंतचा प्रवास अत्यंत जलद आणि सुलभ होणार असून त्यासाठी विमानाचीही गरज भासणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यासोबतच, मुंबई ते बंगळुरू हा प्रवास अवघ्या पाच तासांत पूर्ण होईल, असे दर्जेदार रस्तेही बनवण्यात येत असल्याचे गडकरी यांनी यावेळी स्पष्ट केले.

याच कार्यक्रमात गडकरी यांनी पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाच्या गंभीर समस्येवरही भाष्य केले. या समस्येवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी येत्या दोन वर्षांत पुणे आणि आसपासच्या परिसरासाठी तब्बल ६० हजार कोटी रुपयांच्या विविध रस्ते प्रकल्पांची कामे हाती घेतली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या भव्य विकासकामांमध्ये ३१ हजार ६०० कोटी रुपयांच्या अत्यंत महत्त्वाच्या अशा 'शिरूर ते पुणे' प्रकल्पाचाही समावेश करण्यात आला असून, यामुळे पुणेकरांचा प्रवास भविष्यात अधिक सुखकर होणार आहे.

पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी फोडण्यासाठी नितीन गडकरी यांनी अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची आणि निधीची घोषणा केली आहे. यात हडपसर-यावत मार्गासाठी ५,२६५ कोटी रुपये, तळेगाव-चाकण-शिक्रापूर या ५३ किमी टप्प्यासाठी ४ हजार कोटी रुपये, तर शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या १९२ किमी मार्गासाठी १५ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. याशिवाय, खेड ते नाशिक फाटा (३० किमी) मार्गासाठी ८ हजार कोटी, रावेत ते नऱ्हे मार्गासाठी ६ हजार कोटी आणि पुणे ते सोलापूर महामार्गासाठी ८ हजार कोटी रुपयांचा भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

देशातील रस्ते जाळ्याच्या विस्ताराबाबत माहिती देताना गडकरींनी सांगितले की, अटल सेतू ते पागोटे चौक आणि तिथून पुढे पुण्यापर्यंत एक नवीन आणि वेगवान रस्ता विकसित केला जात आहे. या नवीन मार्गावरून थेट बंगळुरूपर्यंतचा प्रवास अवघ्या पाच तासांत पूर्ण करता येईल, अशी आधुनिक व्यवस्था उभारली जात आहे. तसेच, शिळफाटा ते पनवेल आणि जुन्या पुणे-मुंबई महामार्गाच्या सुधारणेवरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, या रस्ते विकासाच्या कामांसाठी तब्बल ६० हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

पायाभूत सुविधा क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या (AI) वापराबाबत गडकरी यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. भविष्यात सॅटेलाइटशी थेट जोडलेली वाहने रस्त्यांवरील त्रुटी आणि दोष त्वरित शोधून काढतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, टोलच्या मुद्द्यावर थेट भाष्य करताना ते म्हणाले की, पूर्वी मुंबई-पुणे प्रवासासाठी ६ ते ७ तास लागायचे, मात्र नवीन महामार्गामुळे हा वेळ अवघ्या दोन-अडीच तासांवर आला आहे. त्यामुळे वेळेची आणि इंधनाची बचत करणाऱ्या अशा चांगल्या दर्जाच्या रस्त्यांच्या सुविधा मिळवायच्या असतील, तर त्यासाठी जनतेला टोल द्यावाच लागेल, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

## 'शिवेंद्रराजेंनी सातारा जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारावे' : मंत्री जयकुमार गोरेंनी बोलून दाखवली इच्छा



सातारा : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असतानाच, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर येथील एका कार्यक्रमात केलेल्या विधानाने जिल्ह्यात नव्या राजकीय चर्चेला उधाण आले आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारावे, अशी उघड इच्छा गोरे यांनी व्यक्त केली आहे. तसेच, शिवेंद्रराजे आणि आपले अत्यंत मैत्रीपूर्ण संबंध असून, आम्ही दोघांनी मिळून या जिल्ह्याची जबाबदारी आणि पालकत्व सांभाळल्यास त्याला आपली कोणतीही हरकत नसल्याचीही गोरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

महत्त्वाची खाती असणे ही मोठी राजकीय ताकद असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी नमूद केले आहे. २०२५ च्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे लातूरचे, तर जयकुमार गोरे यांच्याकडे सोलापूरचे पालकमंत्रिपद सोपवण्यात आले होते. तसेच साताऱ्याची जबाबदारी सध्या मंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे आहे. अशा परिस्थितीत गोरे यांनी केलेल्या ताज्या वक्तव्यामुळे साताऱ्याच्या पालकमंत्रिपदात बदल होण्याच्या चर्चांना पुन्हा उधाण येण्याची शक्यता आहे.

दरम्यान, जयकुमार गोरे यांनी शंभूराज देसाई यांचे पालकमंत्रिपद बदलण्याची थेट मागणी केली नसली तरी, या सूचक विधानावरून गोरे आणि देसाई यांच्यात सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपदावरून निर्माण झालेल्या वादावर अद्यापही पडदा पडलेला नाही, हेच स्पष्टपणे दिसून येत आहे.

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेने आता चांगलाच वेग घेतला असून, मतदारांच्या ठरावाचे काम पूर्ण झाले आहे. या निवडणुकीसाठी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी जोरदार तयारी सुरू केली असतानाच, विद्यमान संचालक शेखर गोरे यांनीही पुन्हा एकदा बँकेच्या आखाड्यात शड्डू ठोकला आहे. विधान परिषदेची उमेदवारी न मिळाल्याने शेखर गोरे यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीत उतरण्याची ठाम भूमिका घेतल्याने, आगामी काळात मंत्री जयकुमार गोरे यांच्यासमोर मोठे राजकीय आव्हान उभे राहिले असून त्यांची अडचण वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सातारा जिल्ह्यातील सर्वच निवडणुकांमध्ये निर्विवाद वर्चस्व मिळवल्यानंतर आता भारतीय जनता पक्षाने जिल्हा बँकही ताब्यात घेण्याचा चंग बांधला आहे. मात्र, बँकिंग क्षेत्रातील नव्या नियमांमुळे या निवडणुकीत मोठे फेरबदल पाहायला मिळणार आहेत. या नव्या नियमांचा थेट फटका मंत्री शिवेंद्रराजे भोसले, खासदार उदयनराजे भोसले आणि रामराजे नाईक निंबाळकर यांच्यासह जिल्ह्यातील तब्बल दहा दिग्गज नेत्यांना बसणार असून त्यांचा पत्ता कट होणार आहे. परिणामी, या बदललेल्या राजकीय समीकरणामुळे मंत्री शंभूराज देसाई, मंत्री जयकुमार गोरे आणि मंत्री मकरंद पाटील या नेत्यांना जिल्हा बँकेत महत्त्वाची संधी उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ ऑगस्ट २०२६

# जाधव हॉस्पिटल कन्नड येथे अत्याधुनिक व्हेंटिलेटर सेवेला प्रारंभ



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड शहरातील नामांकित जाधव नर्सिंग होम अँड आयसीयू सेंटर येथे तालुक्यात प्रथमच अत्याधुनिक व्हेंटिलेटर मशीनची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या आधुनिक व्हेंटिलेटर मशीनचे उद्घाटन जाधव हॉस्पिटलमध्ये नुकतेच रुजू झालेले फिजिशियन डॉ. उत्कर्ष मुंडे (एमबीबीएस, एमडी मेडिसिन) यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी कृषिभूषण तथा जाधव हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एस. जे. जाधव प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. उत्कर्ष मुंडे म्हणाले की, कन्नड तालुक्यातील गंभीर रुग्णांना उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर किंवा इतर शहरांकडे धाव घेण्याची आवश्यकता आता उरणार नाही. अत्याधुनिक व्हेंटिलेटरच्या माध्यमातून हार्ट अटॅक, मधुमेहामुळे उद्भवणाऱ्या गुंतागुंती, क्षयरोग (टीबी), दमा, डोक्याला गंभीर दुखापत (हेड इंज्युरी), अपघातग्रस्त तसेच अतिगंभीर रुग्णांवर कन्नड येथील जाधव हॉस्पिटलमध्येच प्रभावी उपचार करता येणार आहेत. त्यामुळे तालुक्यातील नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. याचबरोबर जाधव डायग्नोस्टिक सेंटर येथे डॉ. रविराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक सीटी स्कॅन, सोनोग्राफी, हृदयाची तपासणी (2D इको), डिजिटल एक्स-रे यांसह विविध निदान सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असून, रुग्णांना एकाच ठिकाणी सर्व वैद्यकीय सेवा मिळत असल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. कार्यक्रमात डॉ. उत्कर्ष मुंडे यांचे स्वागत जाधव हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एस. जे. जाधव*यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन केले.

याप्रसंगी स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अय्याज उजाडे, जाधव हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सदाशिव पाटील, डॉ. उमेश दहेतकर, डॉ. गोपाल पाचोळे, डॉ. शहाजिया पठाण, डॉ. सना कौसर खान, डॉ. संजीवनी राजपूत, डॉ. भाग्यश्री चव्हाण तसेच जाधव हॉस्पिटलचे सर्व डॉक्टर, स्टाफ व सिस्टर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार रशीद मामू यांनी मानले.




# उर्मिला, तुझे दु:ख

उर्मिला,
तुझे दु:ख रामायणाच्या पानांवर
कुठेच लिहिले गेले नाही;
कारण इतिहासाला नेहमी
युद्ध करणारे पुरुष दिसतात,
पण युद्धाच्या सावलीत
एकटी उभी असलेली स्त्री दिसत नाही.

राम वनवासाला निघाला,
सीता त्याच्यासोबत गेली,
लक्ष्मणाने भावाच्या पावलांवर
आपले आयुष्य अर्पण केले;

पण तू?
तू कोणता केला होता अपराध?

तुझ्या हाताला नेमकी लागली होती
मेहंदी,
डोळ्यांतही होती स्वप्ने, नवऱ्याच्या सोबतीने
उद्याचे आयुष्य जगण्याची
तुलाही तितकीच होती इच्छा.

लक्ष्मण गेला—
रामाच्या सेवेसाठी.
आणि तू राहिली—
अयोध्येच्या महालात,
की स्वत:च्या एकटेपणाच्या तुरुंगात?

उर्मिला कोणी तुझ्या डोळ्यांत पाहिले का?
तुला कोणी विचारले का—
"उर्मिला,तुला काय हवे आहे?"

तुझ्या त्यागाला
देवत्व देणे सोपे होते,
पण तुझ्या वेदनेला
मानवी शब्द देणे
कदाचित कठीण होते.

तू चौदा वर्षे
निवांत झोपली होती का?
की प्रत्येक रात्री
लक्ष्मणाच्या अनुपस्थितीशी
तुझे मन युद्ध करत होते?

रामायणाने
लक्ष्मणाच्या जागरणाची कथा सांगितली,
पण तुझ्या जागेपणाची
कथा कुणी लिहिली नाही.

लक्ष्मणाने रामाला साथ दिली,
हे गौरवाने सांगितले गेले;
पण उर्मिलाने
लक्ष्मणाच्या अनुपस्थितीला
साथ दिली,
हे कुणी लक्षात ठेवले नाही.

उर्मिला,
तू युद्धभूमीवर नव्हतीस,
म्हणून तुझे युद्ध
युद्ध मानले गेले नाही.

तुझ्या हातात तलवार नव्हती,
म्हणून तुझा संघर्ष
पराक्रम ठरला नाही.

तुझ्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू
इतिहासाच्या शाईत मिसळले नाहीत.

पण आज
रामायणाची दुसरी बाजू वाचताना
एक प्रश्न पुन्हा उभा राहतो—
उर्मिला, तुझ्या संमतीशिवाय
तुझा त्याग महान कसा झाला?

तुझ्या वेदनेवर
"कर्तव्य"चा मुलामा चढवून
समाजाने स्त्रीला
पुन्हा पुन्हा त्याग शिकवला नाही का?

उर्मिला,
तू फक्त लक्ष्मणाची पत्नी नव्हतीस;
तू स्वत:च्या इच्छा,
स्वत:ची स्वप्ने,
स्वत:चे अस्तित्व असलेली
एक स्त्री होतीस.

म्हणूनच आज
तुझ्याकडे देव्हाऱ्यातून नाही,
तर माणूस म्हणून पाहायचे आहे.

तुझ्या त्यागाला नमन करण्यापूर्वी
तुझ्या दु:खाला आवाज द्यायचा
आहे.

कारण—
रामायणातील सर्वांत मोठे युद्ध
कदाचित लंकेत झाले नसेल;
कदाचित ते उर्मिलाच्या मनात
चौदा वर्षे चालले असेल.



— डॉ. बाळासाहेब लिहिणार

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ ऑगस्ट २०२६


## ताई भावाकडे आली

नागपंचमीला ताई
आली बघा माहेराला,
भाऊ आणे बहिणीला,
साडी चोळी आहेराला. १

साडी चोळी पाहताच,
झाली बहीण आनंदी.
भाऊराया आशीर्वाद,
देते होऊन स्वच्छंदी. २

नागपंचमीला भाऊ,
नागोबाची पूजा करू.
झोका झाडाला बांधून,
करा झुलायला सुरू. ३

झोका खेळता बहिण,
हर्ष उल्हासित झाली.
आनंदाने माहेराला,
ताई भावाकडे आली. ४

डोळे धुऊन भावाचे,
खूप आयुष्य मागते.
भाऊ राहावा निरोगी,
निर्मिकास ती सांगते. ५

माहेराच्या अंगणात,
झोका आनंदात झुले.
झोका झुलता बहिण,
हास्य गालावर खुले. ६

नागपंचमीचा सण,
आहे बहिणीला मान.
बाप नसतांना तुझी,
ताई आहे मला भान. ७

ताई आनंदात यावे,
आहे तुझा भाऊ घरी.
जपणार जिवापाड,
नाते बहिणीचे उरी. ८



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

## मूलनिवासी

प्रास्ताविकेत
आम्ही भारताचे लोक,
आम्हीच आहोत देशाचे मूलनिवासी
आज
न्याय नाही आम्हा,
पडतो तोंडघाशी.

देशात,
शिक्षणाचा बट्ट्याबोळ,
पेपरफुटी,परीक्षेत घोळ.
जातीवाद,धर्मवाद
पाचवीला पुंजला.
समता,बंधुता न्याय,
नाही गुंजला.

ना सकसता ,भेसळ,अन्नचा अभाव,
आरोग्याचा दवाखान्यात खेळखंडोबा
इजेक्शन पाणी ,गोळ्याचा महापूर
डॉक्टरची फी मालदार
खासदार-आमदार नगरसेवक भत्ते,
दौरे कोटीत बाजारभाव

शेतकऱ्याच्या पोटात ना अन्न,
अट्विवतात घाम,चेहरा खिन्न.
डोळ्यात आसू,पाऊस पाणी तीर्थ,
जीवनाला नाही काहीच अर्थ.

ओघ पिंडीवर ,बालकांना ना दुध,
कावड खांद्या,धार्मिक विष बेधुंद.
काम नाही हाताना, मिळेना दाम.
असंख्य बालक पिति आईचा घाम.

फाटले आभाळ,फाटले संसार,
ठिगळ शिवावे,किती? सुई दोरा उधार.
जंतर मंतर वर उडी घेऊन करावी क्रांती
नोकऱ्या असूनही ,आमची भ्रांती.

द्रौपदी खरगे मायावती,यादव
यांना पक्के लेबल, बळीराजास फाशी
घटना तंदुरुस्त,
कुठे शिंकते माशी.
ते पंधरा टक्के लोक
आपण पंच्यांशी.

उर,बडवून सांगतो,तुम्हा...
आम्हीच देशाचे आहोत.
नागवंशीय
मूलनिवासी.

पक्के , मूलनिवासी
मूळ मूलनिवासी....
मूलनिवासी.....
मूलनिवासी
मूलनिवासी....

( मधुबानंदा प्रधान,अकोला.
नागपंचमी२०२६)

# तिफण ट्रेकिंग ग्रुपने सर केले कळसूबाई शिखर





**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राचे सर्वोच्च शिखर आणि "सह्याद्रीचा एव्हरेस्ट" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कळसूबाई शिखरावर तिफण ट्रेकिंग व तिफण सखी मंच ग्रुपच्या १६ सदस्यांनी यशस्वी ट्रेक पूर्ण केला. पहाटे सूर्योदयाच्या वेळी शिखरावर पोहोचून सर्वांनी तिरंगा फडकवत देशभक्तीचा गजर केला.तिफण ट्रेकिंग ग्रुपच्या वतीने ही मोहीम आयोजित करण्यात आली होती. शनिवारी रात्री सर्व ट्रेकर्स बारी या पायथ्याच्या गावात पोहोचले. सुरक्षिततेच्या सूचना आणि मार्गदर्शन घेतल्यानंतर रविवारी पहाटे ५ वाजता मशालींच्या उजेडात ट्रेकला सुरुवात झाली.अतिशय उंचीचे कळसूबाई शिखर चढण्यासाठी लोखंडी शिड्या, उभ्या कातळवाटा आणि घसरडी वाट पार करावी लागते. अंधारात अत्यंत कठीण चढाई केल्यानंतर सर्व सदस्यांनी शिखर गाठले. ढगांच्या वरून दिसणारा सूर्योदय आणि आजूबाजूचा निसर्गरम्य परिसर पाहून सर्वांचा थकवा दूर झाला.शिखरावर असलेल्या कळसूबाई देवीचे दर्शन घेतल्यानंतर ग्रुपचे मार्गदर्शक डॉ. शिवाजी हुसे हस्ते तिरंगा फडकवण्यात आला. यावेळी "भारत माता की जय", "वंदे मातरम्" 'छत्रपती शिवाजी महाराज की 'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. सर्वांनी शिखरावर फोटो काढून आठवणी जतन केल्या.परतीच्या वाटेवर तिफण ट्रेकिंग ग्रुपच्या सदस्यांनी "स्वच्छ सह्याद्री" मोहीम राबवत शिखर परिसरातील प्लास्टिक व कचरा गोळा केला. दुपारी सर्व सदस्य सुरक्षितपणे बारी गावी परतले.या ट्रेकमध्ये निसर्ग संवर्धनासोबत शारीरिक क्षमता आणि सांघिक भावना वाढवणे हे तिफण ट्रेकिंग ग्रुपचे मुख्य उद्दिष्ट आहे.

या ट्रेकिंगमधे डॉ. शिवाजी हुसे, विलास कापडे, कैलास मुगले, प्रभाकर मुंढे, सोमनाथ ताठे, अनिल ताठे, रघुनाथ ताठे, हरिदास पाले, उर्मिला हुसे, वैशाली कापडे, योगेश्वरी मुंडे, अनुसया मुगले, कल्पना पाले, प्रतिभा ताठे, भारती ताठे, कोमल काजे आदींची उपस्थिती होती.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अ‍ॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ ऑगस्ट २०२६


# एस.पी. स्कूलमध्ये ध्वजारोहण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**दरेगाव :** फुलंब्री तालुक्यातील दरेगाव येथील एस.पी. स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्रीराम नाना पाटील मालोदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजिनाथ मालोदे हे होते. त्यांच्या हस्ते शालेय परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता मालोदे यांनी केले. यावेळी प्रभात फेरी, कवायत तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी प्राचार्य गजानन तायडे, रावसाहेब महालकर, संदीप मालोदे, शालिनी म्हस्के, प्रभाकर प्रधान आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला गावातील समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मोहाडी येथे स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा








**मोहाडी, जळगाव :** मोहाडी येथील 'इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज' मध्ये भारताचा स्वातंत्र्यदिन अत्यंत देशभक्तीपूर्ण वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला.शाळेचे चेअरमन डॉ.अब्दुल करीम सालार यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकावण्यात आला. ध्वजारोहणानंतर इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत सादर केले.यानंतर शाळेच्या बँड पथकाच्या तालावर संचलन करत विद्यार्थ्यांनी डॉ. सालार यांना गार्ड ऑफ ऑनर दिली.उपस्थित विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना संबोधित करताना डॉ.सालार यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व सांगून देशकार्यासाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. तसेच, विद्यार्थ्यांनी देशभक्तीचे मूल्य जोपासून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.ध्वजारोहणानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे आणि गीते सादर केली.मरून रंगाचे ब्लेझर आणि वेस्टकोट परिधान केलेल्या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

उत्कृष्ट भाषण आणि गायनासाठी मुख्याध्यापक व वरिष्ठ शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.आरिफ खान यांनी केले.सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## अध्यापन व सेवाकार्यातील योगदानाचा गौरव; श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील चौघांचा पुरस्काराने सन्मान









**उमरगा :** भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्यदिनी दरवर्षी महाविद्यालयातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या चार कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येतो. यामध्ये वरिष्ठ महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, कार्यालयीन कर्मचारी आणि शिक्षकेतर कर्मचारी अशा चार विभागांतील कर्मचाऱ्यांची त्यांच्या कार्याच्या आधारे निवड करून त्यांना पुरस्कार प्रदान केला जातो.यावर्षी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी वरिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. अजित आष्टे आणि कनिष्ठ महाविद्यालयातील रसायनशास्त्राचे प्रा. संजय बारबोले यांची निवड करण्यात आली. संशोधन, उत्कृष्ट अध्यापन कौशल्य, विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी तसेच महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीत उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच 'बेस्ट एम्प्लॉयी ऑफ द इयर' पुरस्कारासाठी कार्यालयीन कर्मचारी श्री. मताजी पवार आणि शिक्षकेतर कर्मचारी श्री. विनायक जाधव यांची निवड करण्यात आली. संस्थेप्रती असलेली निष्ठा, प्रामाणिक सेवा, जबाबदारीची जाणीव आणि महाविद्यालयाच्या कार्यात दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. या चारही आदर्श कर्मचाऱ्यांचा भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय अमोल मोरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मान करण्यात आला. यावेळी भारत शिक्षण संस्थेचे चिटणीस मा. पद्माकरराव हरळकर, संचालक मा . सुरेशदाजी बिराजदार, मा. डॉ. सुभाषराव वाघमोडे, मा. सुनील माने आणि मा. दिगंबरराव बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्याची महाविद्यालयाची ही परंपरा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अधिक प्रेरणा देणारी ठरत आहे.

पुरस्कार प्राप्त चारही कर्मचाऱ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ ऑगस्ट २०२६


## पोलिस उपनिरीक्षक रफीक पठाण यांचा अतिउत्कृष्ठ सेवा पुरस्काराने गौरव





**दौलताबाद (जावेद अहमद) :** १५ ऑगस्ट रोजी विभागीय आयुक्त कार्यालय येथे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते पोलीस अधिकारी पोलीस अंमलदार यांना सन्मानित करण्यात आले पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी उत्कृष्ट सेवा व अति उत्कृष्ट सेवा बद्दल गृह मंत्रालय यांच्या वतीने सन्मान करण्यात येते दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेले रफीक आदाम पठाण अति उत्कृष्ट सेवा म्हणून त्यांना पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आले आहेयापूर्वी सुद्धा रफिक पठाण यांना त्यांनी किल्लारी भूकंप तसेच बॉम्ब पथकात कर्तव्य बजावलेले आहे या त्यांच्या चांगल्या कामगिरीची दाखल घेत पोलीस महासंचालक कार्यालयातर्फे एक आगाऊ वेतन वाढ तसेच पोलीस महासंचालकाचे सन्मानचिन्ह मिळालेले आहे त्यांनी राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यात घातपात विरोधी तपासणी मध्ये गोल्ड आणि सिल्वर मेडल प्राप्त केलेले आहे तसेच छावणी येथील शासकीय निवासस्थान परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून झाडे जगवलेली आहे याबाबत छावणी परिषदेच्या वतीने उपाध्यक्षांनी सत्कार केलेला आहे या उल्लेखनीय कामगिरी बद्दल दौलताबाद पत्रकार संघाच्या वतीने पठाण यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक नितीन खडागळे, छावणी वाहतूक पोलीस निरीक्षक मिरधे, उपनिरीक्षक आयुब पठाण, पत्रकार शेख अमीर,बी के पठाण, किशोर पाटील, अभय विखनकर,शिवाजी अस्वार, जावेद शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

# फुलंब्री मॅरेथॉन (मिनीथॉन) स्पर्धेत ८५३ खेळाडूंचा सहभाग



**फुलंब्री :** श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व संत सावता गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राज्यस्थान राज्याचे महामहिम राज्यपाल श्री. हरिभाऊ बागडे नाना यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य मॅरेथॉन (मिनीथॉन) स्पर्धेचे आयोजन फुलंब्री येथे दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे. या स्पर्धेत कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, नंदुरबार, नाशिक, शिरपूर, अकोला, बुलढाणा, जालना, अंबड, रत्नागिरी व छत्रपती संभाजीनगर आदी जिल्हातील ६२३ मुले व २३० मुली एकूण ८५३ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. तसेच ७ पोलीस अकॅडमी यांनी सहाभाग नोंदविला. या स्पर्धेचे उद्घाटन फुलंब्री मतदार संघाच्या आमदार सौ. अनुराधाताई चव्हाण तथा विधानपरिषद सदस्य आमदार श्री. सुहासभाऊ सिरसाठ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे सचिव श्री. निवृत्ती पाटील गावंडे यांनी भुसवले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन संस्थेचे पालक संचालक प्राचार्य प्रदीप जबदे, गटनेता तथा नगरसेवक, नगरपरिषद फुलंब्री श्री. योगेश मिसाळ, नगरसेवक गजानन नागरे, वाल्मिक जाधव, डॉ. श्रीनिवास मोतियेले, डॉ. विलास तांगडे, डॉ. लक्ष्मण जाधव, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे बक्षीस वितरण फुलंब्रीचे आमदार, सुहास सिरसाठ, डॉ. बाप्पासाहेब मस्के, डॉ. भुजंग डावकर, डॉ. प्रशांत तौर, सुरेश मिरकर व पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक, श्री. बारहाते यांच्या हस्ते झाले. स्पर्धेचा निकाल ५ किलोमीटर मुले प्रथम - सिध्दनाथ जगताप (सातारा)द्वितीय - योगेश पाडुळे (सांगली)तृतीय - राहुल खरात (बीड)५ किलोमीटर मुली प्रथम - मनीषा पाडवी (नंदुरबार)द्वितीय - सोनाली मातने (छ. संभाजीनगर)तृतीय - भावना चव्हाण (नाशिक)३ किलोमीटर मुलेप्रथम - अभिषेक गुळविणे (संभाजीनगर)द्वितीय - अभिषेक रोकडे (बुलढाणा)तृतीय - महेश चव्हाण (पैठण)३ किलोमीटर मुलीप्रथम - आकांक्षा नरवडे (वैजापूर)द्वितीय - तेजस्विनी मस्के (संभाजीनगर)तृतीय - गीता आगवणे (वैजापूर)या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, समितीचे सचिव डॉ. संदीप जगताप, मुख्याध्यापक अप्पासाहेब चव्हाण, कल्पना उरणकर, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. विजय पांडे, डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. रामकिसन लोमटे, डॉ. महेश थोरात, डॉ. सुरेश मंढे, डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ. राजर्षी पवार, प्रा. दत्तात्रय येडले, प्रेम चव्हाण, बाबासाहेब दाभाडे, कृष्णा आढाव, प्रशांत मिसाळ, गंगावणे, रेखा बागडे आदींनी प्रयत्न केले. फोटो कॅप्शन फुलंब्री मॅरेथॉन (मिनीथॉन) स्पर्धेच्या विजयी खेळाडू समावेत आमदार सौ. अनुराधाताई चव्हाण, आमदार श्री. सुहासभाऊ सिरसाठ, श्री. निवृत्ती पाटील गावंडे, प्राचार्य, प्रदीप जबदे, नटनेता तथा नगरसेवक, श्री. योगेश मिसाळ, डॉ. बाप्पासाहेब मस्के, डॉ. भुजंग डावकर, डॉ. प्रशांत तौर, राचार्य डॉ. एस. आर. टकले, समितीचे सचिव डॉ. संदीप जगताप, मुख्याध्यापक अप्पासाहेब चव्हाण आदी दिसत आहेत.





# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १८ ऑगस्ट २०२६

# कर्म करत जा फळ जरूर मिळेल - १००८ स्वामी परमानंद गिरी महाराज



**दौलताबाद (जावेद अहमद) :** पशुपतेश्वर महादेव मंदिरात वर्धपान दिन उत्स्हात कार्यक्रम साजरा झालाशहरा पासून जवळ भांगशीमाता गड शरणापूर छत्रपती संभाजीनगर पायथ्याशी असलेल्या लाल दगडात कोरलेले भव्य असे पशूपतेयश्वर महादेव मंदिराचा तिसरा वर्धापन दिन दि १७ ऑगस्ट नागपंचमी श्रावण शुद्ध पंचमी सोमवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांसह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरी महाराज यांच्या प्रेरणेतून लाल पाषानात हेमाडपंथी पशुपतेयश्वर महादेव मंदिर बांधण्यात आलेले आहे. या मंदिरात महादेवाची सव्वाचार फुट लांब व सव्वादोन फुट उंच अशी महादेवाची पिंड आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होतीअल्पावधीतच भाविकांमध्ये लोकप्रिय ठरलेल्या या पशूपतेयश्वर मंदिराच्या वर्धापण दिनानिमित्त सकाळी सात ते दुपारी बारा वाजेपर्यंत अंदरसुल चे निलेश गुरुजी यांच्या हस्ते रुद्राअभिषेक, रूद्रयज्ञ पार पडले. यावेळी तीस दाम्पत्य जोडपे हवन पूजेसाठी बसले होते दुपारी एक वाजता १००८ स्वामी परमानंदगिरी महाराज यांचे प्रवचन झाले व रक्तदान शिबीर, आणि भांगशी गड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले आणि शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आलेयावेळी खासदार कल्याण काळे,नगरसेवक हर्षदा शिरसाठ, राजू राजपूत, लक्ष्मण लिंभारे, ईश्वर लिंभारे व्यवस्थापक सांडू पवार व भाविक भक्त उपस्थित होते.

# मिराई विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** मिराई प्राथमिक विद्यामंदिर व मिराई माध्यमिक विद्यालय, इंदिरानगर-बापूजीपूरा येथे भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. सर्वप्रथम महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांची मान्यवरांच्या हस्ते पूजा करण्यात आली. कास्ट्राईब संघटनेचे नेते प्रा. देवानंद वानखडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक तथा नगरसेवक कैलास गायकवाड होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मीराबाई गायकवाड, डॉ. धनंजय भोसले, नगरसेविका दया दिवेकर (गायकवाड), डॉ. पंडित आराक, सामनाचे उपसंपादक डॉ. पंजाबराव मोरे, डॉ. फारुक पटेल, डॉ. निखिल पटेल, प्रतिभा लिपने, प्रविण लिपने, अर्चना गायकवाड, सुजाता गायकवाड, राधा गायकवाड होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व भाषणे केली. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील बरसे तर आभार आहेर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षकांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने पालक व नागरिक उपस्थित होते.

# मराठा महिलांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य भोवले



**जालना :** 'ओबीसी नेत्यांची गोंडस मुले आणि पैसा पाहून मराठा समाजाच्या मुली त्यांच्या घरात घुसतात,' असे अत्यंत संतापजनक आणि आक्षेपार्ह विधान करणारे ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांच्यावर अखेर जालना पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या विधानावरून राज्यभरात मराठा समाजातील महिला कमालीच्या आक्रमक झाल्या होत्या. वाढता दबाव आणि ठिकठिकाणी होणाऱ्या निदर्शनांनंतर वाघमारे यांनी आपल्या वक्तव्याबाबत खेद व्यक्त करत माफी मागितली आहे.

एका यूट्यूब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत नवनाथ वाघमारे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून बोलताना थेट नेत्यांच्या घरातील महिलांना लक्ष्य केले होते. ते म्हणाले होते: "स्वतः चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले आहे की, माझी सून मराठा आणि बायको कुणबी आहे. त्यांच्या घरात सगळे 'सोयरे' घुसले असतील. फक्त बावनकुळेच नाही, तर अनेक ओबीसी मंत्र्यांच्या घरात मराठ्यांच्या मुली घुसल्या आहेत. ओबीसी मंत्र्यांची गोंडस मुले आणि पैसा दिसला की मराठा मुली त्यांच्या घरात घुसून लग्न करतात. जर हे मंत्री मराठ्यांच्या मुलींचे ऐकून ओबीसींचे वाटोळे करत असतील, तर त्यांनी समोर येऊन सांगावे, असेही वाघमारे म्हणाले होते.

वाघमारेंच्या या विधानामुळे मराठा समाजाला टार्गेट करण्यासाठी थेट महिलांचा अपमान झाल्याची भावना निर्माण झाली आणि राज्यभरात संतापाची लाट उसळली. जालना येथील कदीम पोलीस ठाण्यात मराठा समाज बांधवांनी वाघमारे यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करत तक्रार दाखल केली. दोन समाजांत तेढ निर्माण करणे आणि महिलांच्या लज्जेस धक्का पोहोचेल असे वक्तव्य केल्याप्रकरणी वाघमारेंवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती उपअधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी दिली. नांदेडमध्ये 'सकल मराठा समाजाच्या' महिलांनी मोठा मोर्चा काढून वाघमारेंच्या तोंडाला काळे फासण्याचा इशारा दिला होता. तर सोलापूरच्या माढ्यातही त्यांच्याविरोधात जोरदार निदर्शने झाली.

राज्यभरातून होणारा कडाडून विरोध आणि गुन्हा दाखल झाल्यानंतर नवनाथ वाघमारे यांनी बॅकफूटवर जात माफी मागितली आहे. "बावनकुळेंवर मनोज जरांगे यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना ओघात माझ्याकडून हे वक्तव्य गेले. यापूर्वी माझ्याकडून असे कधीही विधान गेले नाही. राज्यातील भगिनींनी मला समजून घ्यावे आणि पदरात घ्यावे," असा खेद त्यांनी व्यक्त केला.

मात्र, माफी मागतानाही त्यांनी मनोज जरांगेंवर निशाणा साधलाच. "जरांगेंनी छगन भुजबळ, मुंडे बंधू-भगिनी, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना केलेल्या शिवीगाळी प्रकरणी ते कधी माफी मागणार?" असा प्रतिसवाल वाघमारेंनी विचारला.




बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002